नि.दि.दा.क्र.४५१/२०१२
सुरेखा
-वि-
विश्वास
**CNR No.MHPU1300-0979-2012**

**<u>निशाणी क्र. ९६ वरील आदेश</u>**
(पारीत दि.१९ जून, २०२५ रोजी)

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घ ेण्याकरीता झालेला विलंब माफ करून मिळणेसाठी सादर केलेला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ विश्वास गोविंद काळाणे हे दिनांक ०४.१२.२०२४ रोजी मयत झालेले आहेत. वादी यांना कायद्याचे फारसे ज्ञान नाही. तसेच वादी आजारी असल्याने त्यांना वारसाबाबत माहिती घेता आली नाही. तसेच विधिज्ञांना तशी कल्पना देता आली नाही त्यामुळे मुदतीत वारस अभिलेखावर घेता आले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ विरूद्ध दावा अबेट झाला आहे. असे कथन करून अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी यांनी अर्जावर न्यायाच्या दृष्टीने योग्य व न्याय आदेश व्हावेत असे म्हणणे दिले आहे.

३. माझे या ठिकाणी असे मत आहे की, वादी ही आजारी असल्याने मुदतीत विधिज्ञांना प्रतिवादी क्र. १ मयत झाल्याची कल्पना देवू शकली नाही असे दिसते. वादीने तिच्या कथनांच्या पृष्ठर्थ अर्जासोबत प्रतिज्ञापत्र दिले आहे. प्रतिवादी क्रं. १ यांचे वारस अभिलेखावर घेणे दाव्याच्या पुढील कार्यवाहीसाठी आवश्यक आहे. अर्जाचे योग्य कारण आहे. प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेल्या उशीरामुळे प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांना होणा-या त्रासाची भरपाई काही रक्कम प्रतिवादी क्र. १ च्या वारसांना देवून करता येईल. सबब, न्यायाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब रक्कम रूपये ५००/- इतकी भरपाई प्रतिवादी क्र. १ यांचे वारसांना देण्याच्या अटीवर माफ करण्यात येत आहे.

२. भरपाईची रक्कम वादीने न्यायालयात जमा करावी.

RAVINDRA ANANDRAO SAWANT
Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT
Date: 2025.06.30 14:56:31 +0530

(र. आ. सावंत)

दि.१९.०६.२०२५ दुसरे सह दिवाणी न्यायाधिश(क.स्तर) सासवड